राज्यांतर्गत कार्यान्वित असलेल्या मोठ्या व मध्यम
उपसा सिंचन योजनांच्या कामात समन्वय
साधण्यासाठी सुकाणू समित्यांची स्थापना.

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. संकीर्ण १२९४/[७६२/९४] / मोप्र-१.
दिनांक:- २०।२।१९९५.

<u>प्रस्तावना</u>: उपसा सिंचन योजनांतर्गत असलेल्या कामांचे स्वरूप विचारात घेता प्रकल्पांच्या बांधकामात विविध संघटनांचा सहभाग असल्याशिवाय व विविध यंत्रणां-मध्ये परस्पर समन्वय असल्याशिवाय अशा प्रकल्पांची कामे ठराविक मुदतीत पूर्ण करणे कठीण असते. अशा प्रकल्पांच्या ~~कामाच्या~~ कामकाजात निर्माण होणारे ~~अ~~ अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यासाठी व प्रकल्पांच्या कामाशी संलग्न असणाऱ्या विविध संघटनांमध्ये समन्वय साधण्यासाठी, शासनाने प्रकल्पांच्या कामांना गती देऊन ते विना विलंब पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी कामांचा आढावा घेऊन निर्णय घेणे अत्यावश्यक असते. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या कामात समन्वय साधण्यासाठी शासनाने दिनांक ६ मार्च १९९१ चा शासन निर्णय क्र. पाटबंधारे विभाग क्र. कृको १०९०/सा-१९२३ [४३६/९०] मोप्र-१ सुकाणू समितीची स्थापना केली आहे व सदर समिती कार्यरत असून तिचे उत्साहवर्धक परिणाम दिसून आले आहेत.

अलिकडेच राज्याच्या विविध भागात अनेक मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उपसा सिंचन योजनांना प्रशासकिय मान्यता देण्यात आली ~~आहे~~ आहे व काही उपसा सिंचन योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे विचाराधिन आहे. अशा सर्व उपसा सिंचन योजना संदर्भात देखील सुकाणू समित्यांची स्थापना करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधिन होता. या संदर्भात सर्वकष विचार केल्यानंतर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

<u>निर्णय</u> :

[१] महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभागातर्फे राज्याच्या विविध भागात घेण्यात येणाऱ्या उपसा सिंचन प्रकल्पांची कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी वेगवेगळ्या संघटनांचा सहभाग व त्यांच्यात आवश्यक तो समन्वय असणे ~~आवश्यक आहे~~ अत्यावश्यक आहे. त्याने अशा योजनांच्या नियोजनाबाबत व अंमलबजावणी ~~करताना~~

विविध

निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी खाली नमूद केलेल्या सदस्यांचा प्रकल्प निहाय सुकाणू समित्या स्थापन करण्यात याव्यात

| | |
|---|---|
| [१] मुख्य अभियंता [प्रकल्प] व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| [२] प्रकल्पाशी संबंधित असलेले प्रादेशिक मुख्य अभियंता | सदस्य |
| [३] प्रकल्पाच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेले प्रादेशिक मुख्य अभियंता | सदस्य |
| [४] मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक | सदस्य |
| [५] मुख्य अभियंता, यांत्रिकी विभाग, नाशिक | सदस्य |
| [६] मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प, मुंबई | सदस्य |
| [७] मुख्य अभियंता [समन्वय व नियोजन], महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ~~[illegible]~~, प्रकाशगड, मुंबई | सदस्य |
| [८] अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक [विद्युत गृह/धरणे/द. ध. संबंधित] | सदस्य |
| [९] प्रकल्पाशी संबंधित असलेले अधीक्षक अभियंता | सदस्य सचिव |

२ वरील प्रमाणे स्थापन केलेल्या प्रत्येक सुकाणू समितीची कार्यकारिता व कार्यव्याप्ती पुढीलप्रमाणे राहील.

[अ] बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

[ब] बांधकामाच्या कार्यक्रमात वेळोवेळी कारणपरत्वे आवश्यक बदल [illegible] करणे.

[क] बांधकामाची प्रगती वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

[ड] बांधकामाशी संबंधित विविध कार्ययंत्रणामध्ये समन्वय साधून त्यांचे प्रश्न अडचणी सोडविणे.

[इ] प्रकल्पाच्या आराखड्यात व नियोजनात काही बदल आवश्यक वाटल्यास योग्य त्या शिफारशी करणे.

३ सुकाणू समितीची ~~बैठक~~ कार्यपद्धति पुढीलप्रमाणे राहील.

[अ] सुकाणू समितीची बैठक दर २ महिन्यातून किमान एक वेळा घेतली जाईल. मात्र अध्यक्षांच्या परवानगीने यात बदल होऊ शकेल.

[ब] बैठकीत प्रकल्पास असलेल्या सर्व संबंधित संघटनाकडून/संस्थेकडून आलेल्या प्रस्तावावर / टिप्पण्यांवर विचार विनिमय करण्यात येईल.

...

(क) बैठकीत ठरलेल्या कामकाजासह व आवश्यक त्या सूचनांसह अहवाल शासनाच्या बैठकीच्या दिनांकानंतर १५ दिवसात सादर केला जाईल.

४. सुकाणू समितीच्या बैठकीत जरी विविध मुद्यांसंबंधी त्या प्रश्नावर चर्चा होऊन काही निर्णय घेण्यात आले तरीही अशा निर्णयावर शासनाची अंतिम मंजूरी मिळाल्याशिवाय अंमलबजावणी करता येणार नाही.

५. समितीत समाविष्ट असलेल्या सदस्यांना नियमाप्रमाणे दैनंदिन भत्ते, प्रवास भत्ते व इतर अनुषंगिक खर्च अनुज्ञेय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-

(वि. द. दलाल)

शासनाचे उप सचिव

प्रतिलिपी :

स्वीय सहायक, मा. मंत्री (पाटबंधारे)/मा. राज्यमंत्री (पाटबंधारे)

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

मुख्य अभियंता (प्रकल्प) व सह सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग.

मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (मेरी) नाशिक

मुख्य अभियंता, यांत्रिकी विभाग, नाशिक

मुख्य अभियंता, जल विद्युत, मुंबई

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई ५१

मुख्य अभियंता, (समन्वय व नियोजन), म. रा. वि. मं. प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई ५१

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, कोल्हापूर.

अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक (वि. यु.)/मा. प./द. प.

सर्व अधीक्षक अभियंता.

पाटबंधारे विभाग (अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई ३२

सर्व विभागीय आयुक्त

सर्व सांख्यिक, अधिकारी/सांख्यिक कार्यालये, पा. वि. मंत्रालय/मा. क्र.-२ संग्रहार्थ

अतीत
...२